Date: 11-1-19

# 3. शस्त्र नियंत्रण, शस्त्र स्पर्धा व निशस्त्रीकरण

आंतरराष्ट्रीय संबंधात अनेक संकल्पना आणि समस्यांचा अभ्यास केला जातो. त्यापैकी शस्त्र अस्त्र स्पर्धा शस्त्र नियंत्रण निशस्त्रीकरण या दोन महत्त्वपुर्ण संकल्पना आहेत. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाला वाढती शस्त्र अस्त्र स्पर्धा कारणीभूत आहे. शस्त्र अस्त्र स्पर्धेत आंतरराष्ट्रीय शांतता सुरक्षितता राष्ट्रातील तडा अविश्वास युद्ध व असुरक्षिततेला प्राधान्य दिले शस्त्र अस्त्र स्पर्धा शस्त्र नियंत्रण व निशस्त्रीकरणे या तिन्ही संकल्पना परस्परक पुरक व परस्परावलंबी आहे. परंतु या संकल्पना ~~एक~~ एकसमान किंवा सारख्याच नाहीत.

1) शस्त्रास्त्र स्पर्धा :-

शस्त्रास्त्र स्पर्धेच्या व्याख्या :-

1) शस्त्रास्त्र स्पर्धा म्हणजे शत्रू किंवा प्रतिस्पर्धी राष्ट्राच्या वाढत्या आक्रमण क्षमतेचा सामना करण्यासाठी एखाद्या राष्ट्राने आपले लष्करी सामर्थ्य वाढविण्यासाठी केलेला प्रयत्न होय. अशा प्रकारे ~~प्र~~ स्वत:चे संरक्षण करण्यासाठी शस्त्रास्त्र निर्माण करतात. 1945 पासून जगात शस्त्रास्त्र स्पर्धा तीव्र गतीने सुरु झाली. ज्याचे स्वरुप प्रथमत: युरोपियन राष्ट्रापुरते मर्यादित होते. त्यानंतर ते दक्षिणेकडील राष्ट्रांत व आशियाची राष्ट्रांमध्ये सुरु झाले. शस्त्रास्त्र स्पर्धेची विभागणी खालील दोन प्रकारात केली जाते

1) उर्ध्वस्तरीय शस्त्रास्त्र स्पर्धा
2) समस्तरीय शस्त्रास्त्र स्पर्धा

1) उर्ध्वस्तरीय शस्त्रास्त्र स्पर्धा :-

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि सोवियत रशिया दरम्यान सुरु झालेल्या शस्त्रास्त्र


NATO, SEATO, SENTO, WARSA

स्पर्धेला उर्ध्वस्तरीय शस्त्रास्त्र स्पर्धा म्हणतात. उर्ध्वस्तरीय शस्त्रास्त्र स्पर्धा 1949 मध्ये सोवियत रशिया अण्वस्त्र संपन्न बनल्यानंतर सुरु झाली म्हणजेच ती स्पर्धा शित युध्दाच्या काळात अमेरिका विरुद्ध सोवियत रशिया अशी होती. शितयुध्द काळात अमेरिकेने 750 तर सोवियत रशियाने 550 अनुचाचण्या केल्या. या काळामध्ये अमेरिका व सोवियत रशियाने ~~Inter Quntinental~~ ~~Balis Balistic Missile (ICBM), Subm.~~

इंटर कॉन्टिनेंटल बॅलिस्टीक मिसाईल (ICBM), सबमरिन लॉन्च्ड बॅलिस्टीक मिसाईल (SLBM), ॲन्टी बॅलिस्टीक मिसाईल सिस्टिम (ABMS) आणि मॅन्युव्हरेबल रिएन्ट्री व्हेकल (MARV) इत्यादी शस्त्र अस्त्रांचा विकास केला. 1990 नंतर 1993 साली अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बिल क्लिंटर यांनी राष्ट्रीय क्षेपणास्त्र संरक्षण व्यवस्था या योजनेची घोषणा केली.

2) समस्तरीय शस्त्र अस्त्र स्पर्धा :-

अमेरिका आणि सोवियत रशियाशिवाय शस्त्र अस्त्र स्पर्धेचा जो प्रसार युरोप, आशिया आणि आफ्रिका खंडात झाला त्यास समस्तरीय शस्त्र अस्त्र स्पर्धा म्हटले जाते.




समस्तरीय शस्त्र अस्त्र स्पर्धेत अमेरिका आणि सोवियत रशिया केंद्रस्थानी असतात. तर त्यांच्या भवती भोवती इंग्लंड, फ्रान्स, चीन, भारत, पाकिस्तान यांचा समावेश होतो. शितयुद्धाचे राजकारण अण्वस्त्रांच्या प्राप्तितून मिळणारे राजकीय व आर्थिक फायदे. अण्वस्त्र संपन्नतेमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात वाढणारी प्रतिष्ठा या तीन कारणामुळे समस्तरीय शस्त्र अस्त्र स्पर्धा निर्माण झाली.

~~विसाव्या शतकात~~

* शस्त्र अस्त्र स्पर्धेची कारणे :-

विसाव्या शतकात निर्माण झालेली आणि एकविसाव्या शतकातील शस्त्र अस्त्र स्पर्धा पाहता शस्त्र अस्त्र स्पर्धेची खालील कारणे सांगता येतील.

1) परस्पराविषयीची भिती व असुरक्षितता :-

राष्ट्राराष्ट्रात भिती आणि असुरक्षिततेचे वातावरण शस्त्र अस्त्र स्पर्धेसाठी पोषक परिस्थिती निर्माण करते. भिती आणि असुरक्षितता न संपणारे चक्र आहे. भितीमुळे राष्ट्र संरक्षण खर्चात वाढ करतात. अत्याधुनिक शस्त्र अस्त्रांची

निर्मिती केली जाते संरक्षण करार व लष्करी संघट्नामध्ये सहभाग नोंदवला जातो. शेजारील राष्ट्राने किंवा महासत्ताक राष्ट्राने संरक्षण खर्चात वाढ केली की दुसरे राष्ट्र आपल्या संरक्षण खर्चात वाढ करते अमेरिका व सोवियत रशियाने परस्परांच्या भितीमुळेच, भारत आणि पाकिस्तान, इराक, इराण, उत्तर कोरिया, दक्षिण कोरिया, चीन, जपान, चीन- भारत या सर्वांनी परस्परांच्या भितीतूनच शस्त्र अस्त्र स्पर्धेला खतपाणी घातले आहे.

२) परस्परावरील अविश्वास :-

परस्परावरील संशय आणि अविश्वासाच्या वातावरणाने राष्ट्रातील मैत्री आणि सहकार्याचे वातावरण दुषित होते या वातावरणाच्या परिणामामुळे आपापसातील करार व तह नष्ट होतात. अविश्वासातून आक्रमणाची भिती वाढते या भितीतून स्वतः ला सक्षम करण्यासाठी राष्ट्र शस्त्र अस्त्र स्पर्धेचा किंवा संरक्षण सामर्थ्य वाढवण्याचा प्रयत्न करतात या प्रयत्नातूनच शस्त्र अस्त्र स्पर्धा वाढते. राजकीय प्रश्नांवरुन संघर्ष राष्ट्रामधील राजकीय प्रश्नावरील संघर्षामुळे शस्त्र अस्त्र स्पर्धा वाढते. कारण राजकीय प्रश्न सोडविण्यासाठी लष्करी मार्गाचा अवलंब करणे अनेक राष्ट्रांना सोयीचे व योग्य वाटते. उदा:- चीनचा आपल्या शेजारील १५ पेक्षा अधिक राष्ट्रांबरोबर ~~सिमावाद आहे.~~ सीमावाद आहे. हा सीमावाद सोडविण्यासाठी चीनने तैवान आणि भारतासोबत युद्धाचा मार्ग स्विकारला. भारत व पाकिस्तान मध्ये ~~काश्मिर प्रश्ना~~ काश्मीर प्रश्नावरून चार वेळेस युद्ध झाले असे वारंवार होणारे सीमाप्रश्नावरील वाद शस्त्र अस्त्र स्पर्धा वाढण्यास कारणीभूत ठरतात.

3) संरक्षण तंत्रज्ञानातील प्रगती :-

अलीकडील काळात संरक्षण क्षेत्रात खूप प्रगती झाली आहे. कारण दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व सोवियत रशियासह फ्रान्स, जपान, चीन, कॅनडा, ईस्त्राईल अशा अनेक राष्ट्रांनी संरक्षण क्षेत्रावरील संशोधनावर खूप खर्च केला आहे. परिणामत: अणुबाम, हायड्रोजन बाम, न्यूट्रान बाम, भूगर्भ व आंतराळातील अणूऱ्याच्या क्षेपणास्त्रांचा विकास, पाणबुड्या लढाऊ विमाने अशा अनेक प्रकारच्या अत्याधुनिक शस्त्रांची निर्मिती केली आहे. जगामध्ये अनेक राष्ट्रांकडे अण्वस्त्रांचा विकास करण्याची क्षमता आहे. अशी क्षमता असणे सामर्थ्याचे प्रतिक मानले जाते.

4) शस्त्र अस्त्रांचा व्यापार :-

आर्थिक दृष्टीकोनातून विचार करता शस्त्र अस्त्राच्या खरेदी विक्रीच्या व्यापारामुळे शस्त्र अस्त्र स्पर्धा वाढते. उदा:- अमेरिका, रशिया, फ्रान्स, इटली, इंग्लंड, कॅनडा, चीन, ईस्त्राइल, जपान, अशी अनेक राष्ट्रे शस्त्र अस्त्रांची विक्री करतात. तर दुसऱ्या बाजूने भारत, पाकिस्तान यासारखे अनेक राष्ट्र शस्त्र अस्त्राची खरेदी करणारे आहेत. उदा:- राफेल विमान खरेदी प्रकरण, शस्त्र अस्त्रांची विक्री करणाऱ्या राष्ट्रात या क्षेत्रातील उद्योग धंद्यांच्या हितसंबंधीय गटाची स्थापना झाली आहे. या गटाकडून शस्त्र अस्त्र निर्यातीसाठी शासनावर दबाव आणला जातो. मोठा आर्थिक फायदा मिळून देणारा हा व्यापार आहे.

5) काही समस्यांमुळे वर्तमान आंतरराष्ट्रीय राजकारणाचा विचार करता दहशतवाद, नक्षलवाद व तस्करी या

समस्यांमुळे शस्त्र अस्त्र स्पर्धा वाढत आहे. दहशतवाद्यां सामना करण्यासाठी राष्ट्र शस्त्र खरेदी करतात किंवा स्वत: निर्माण करतात तर दहशतवादी संघटना आपला लढा अधिक तिव्र व प्रभावी करण्यासाठी शस्त्र अस्त्र खरेदी करतात. व निर्माण पण करतात अशीच परि ती नक्षलवादाची व तस्करीतल्या व्यवसायाची आहे शस्त्र अस्त्रांची तस्करी करुन फार मोठ्या प्रमाणात आर्थिक नफा मिळतो तो नफा मिळवण्यासाठी शस्त्र अस्त्रांची तस्करी केली जाते.

6) महासत्ताक देशातील शीतयुध्दाचे राजकारण :-

1945 नंतर आंतरराष्ट्रीय राजकारणांच्या नेतृ साठी अमेरिका आणि सोवियत रशिया यांच्यात शस्त्र अस्त्र स्पर्धा वाढली. साधारणत: ही स्पर्धा 1945 ते 1990 एवढा प्रदीर्घ कालखंड होती. या काळात शस्त्र अस्त्र स्पर्धेला वैश्विक रुप प्राप्त झाले कारण हा कालखंड शस्त्र अस्त्र स्पर्धेच्या वाढीला पोषक होता. नाटो सिटो, सेंटो, अंझुस व वारसा फॅक्ट या लष्करी संघटनें चा उदय याच कालखंडातील आहे. या संघटनांचे सदस्यत्व स्विकारणाऱ्या अनेक राष्ट्रांना अमेरिका व सोवियत रशियाने शस्त्र अस्त्राची मदत केली आहे. या मदतीत शस्त्र अस्त्र विक्री, तंत्रज्ञान विक्री, कुशल मनुष्यबळाचा पुरवठा, आर्थिक मदत व नैसर्गिक साधन संपत्तीचे साह्य अशा अनेक बाबींचा समावेश होता.

वरील प्रमाणे अनेक कारणामुळे शस्त्रास्त्र स्पर्धेत वाढ झाल्याचे सांगता येते.

7) शस्त्रास्त्र स्पर्धेचे परिणाम :-

वरील अनेक कारणामुळे शस्त्रास्त्र स्पर्धा

वाढती या वाढत्या शस्त्रास्त्र स्पर्धेचे अनेक विघातक परिणाम सर्वच क्षेत्रात झाले आहे. शस्त्रास्त्र स्पर्धेच्या परिणामांना सामाजिक, राजकीय, आर्थिक व मानसशास्त्रीय परिणामांमध्ये विभाजीत करता येते. शस्त्रास्त्र स्पर्धेच्या प्रगतीमुळे परिणामा... प्रगती व विकास खुंटतो याशिवाय शस्त्रास्त्र स्पर्धेचे अनेक परिणाम आहेत. या परिणामाच्या विचार खालील प्रमाणे करता येईल.

(I) आर्थिक परिणाम :-

शस्त्रास्त्र स्पर्धेचे आर्थिक परिणाम खालील प्रमाणे सांगता येते.

i) गरीब व श्रीमंत राष्ट्रांतील दरी वाढते.

ii) प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेला नकारात्मक परिणाम सहन करावे लागतात.

iii) जागतिक व्यापारावर नकारात्मक परिणाम होतात.

iv) विज्ञान तंत्रज्ञानासह अनेक विकास व जिवनावश्यक वस्तूंच्या आयात निर्यातीवर अनावश्यक बंधने येतात.

v) शस्त्र अस्त्र स्पर्धेमुळे युद्ध होऊन राष्ट्रांचे प्रचंड आर्थिक नुकसान होते.

vi) देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी बनते.

vii) राष्ट्रांना आर्थिक संकटाच्या सामना करावा लागतो.

viii) जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणे निधीतील आपली पत खालावते.

ix) सामाजिक व शैक्षणिक विकास मंदावतो.

x) लोक कल्याणकारी योजनांवर खर्च करण्यासाठी शासनाकडे पैसा असतो.

xi) शस्त्रास्त्र स्पर्धेत गुंतलेले राष्ट्र कर्जबाजारी होऊ शकते.

xii) या कर्जबाजारीपणातून आर्थिक संकट निर्माण होते. परिणामत: राष्ट्राचे विघटन होते.

xiii) देशाअंतर्गत बेरोजगारी, गरीबी, भूकबळी, अशा

अनेक समस्या निर्माण होतात.
यासह अनेक आर्थिक परिणाम शस्त्रास्त्र स्पर्धेचे होतात.

2) सामाजिक परिणाम :-
वाढत्या शस्त्रास्त्र स्पर्धेचे अनेक सामाजिक परिणाम होतात. या सामाजिक परिणामांना खाली प्रमाणे स्पष्ट करता येते.
i) शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे समाज व लोक कल्याणकारी योजनांमध्ये कपात केली जाते.
ii) आरोग्य, शिक्षण, गरीबी निर्मुलन, गृह बांधणी, यासारख्या समाजकल्याणकारी योजनांवर पुरेसा खर्च होत नाही. राष्ट्रामध्ये महागाई व बेकारी वाढते.
iii) राष्ट्रातील जनतेला अनेक समस्यांचा सामना करावा लागतो.
iv) राष्ट्रांअंतर्गत असणाऱ्या मानवसंसाधन संपत्तीचा विकास होत नाही.
v) लोकांचे राहणीमान उंचावणार नाही.
vi) मानवी हक्कांचे उलंघन होते.
vii) पर्यावरणाचे प्रदूषण वाढते.
viii) शस्त्रास्त्र स्पर्धेच्या निर्मितीवेळी ~~जसे~~ जर स्फोट वायुगळती झाली तर जिवीत हानी मोठ्या प्रमाणात होऊ शकते.

3) शस्त्रास्त्र स्पर्धेचे राजकीय परिणाम :-
शस्त्रास्त्र स्पर्धेचे खालील काही राजकीय परिणाम होतात.

i) राष्ट्राराष्ट्रामध्ये संशयाचे वातावरण निर्माण होते.
ii) परस्परात भिती आणि अविश्वास निर्माण होतो.
iii) युद्ध होण्याची शक्यता अधिक असते.
iv) राजकीय मतभेद वाढू शकतात
v) राजकीय प्रश्नावरील संघर्षांची गुंतागुंत अधिक वाढते.
vi) राजकीय ~~प्रश्न~~ प्रश्न अधिक चिघळतात.
vii) शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे राष्ट्राराष्ट्रातील परस्पर सहकार्य विश्वास आणि चर्चेचे वातावरण नष्ट होते.

वरील प्रमाणे काही राजकीय परिणाम शस्त्रास्त्र स्पर्धेचे होतात.

4) मानसशास्त्रीय परिणाम:-

शस्त्रास्त्र स्पर्धा हिंसाचार आणि युद्धाचा धोका वाढवते. सर्वच राष्ट्रांकडे असणारी अण्वस्त्रे वापरात आली तर काय होईल? अशी एक मानसिक भिती असते. शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे मनुष्य सदैव विनाशाच्या भितीखाली व युद्धाच्या सावटाने जगत असतो. शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे मानवी जीवनातील अनिश्चितता आणि निराशेचे वातावरण निर्माण झाले. शस्त्रास्त्र स्पर्धेने मानसिक रोगांना जन्म दिला. शस्त्रास्त्र स्पर्धेचे मानसिक परिणाम मानवासह अन्य पशुप्राण्यांनाही सहन करावे लागत आहे.

5) युद्धाचा धोका वाढतो:-

शस्त्रास्त्र स्पर्धा ही मुळातच नकारात्मक संकल्पना आहे. या संकल्पनेची परिणामकारकता अधिक नकारात्मकच आहे. शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे युद्धाची शक्यता वाढते. युद्धासाठी पोषक वातावरण निर्माण होते. राष्ट्राचा संरक्षण खर्च वाढतो. लष्करी ~~सामर्थ्य~~ सामर्थ्य वाढविण्या

वर राष्ट्रांचा भर असतो. यातून लष्करी हुकूमशाही प्रस्थापित होण्याचा धोका असतो. राष्ट्र युद्ध पिपासु व साम्राज्यवादी आणि विस्तारवादी भुमिकेचे बनतात.

– सकारात्मक परिणाम :–

शस्त्रास्त्र स्पर्धेचे वरील प्रमाणे काही नकारात्मक परिणाम आहेत. तसेच शस्त्रास्त्र स्पर्धेचे काही सकारात्मक परिणामही आहेत. जे खालील प्रमाणे स्पष्ट करता येते.

i) रोजगार निर्मिती होते.
ii) राष्ट्राची अर्थव्यवस्था मजबूत होते.
iii) राष्ट्राची संरक्षण क्षमता समृध्द बनते.
iv) वैज्ञानिकांना विकास करण्यासाठी चालना भेटते.
v) आंतरराष्ट्रीय राजकारणातील राष्ट्राची प्रतिष्ठा वाढते.
vi) जागतिक अर्थव्यवस्था व निर्णय निर्धारणातील प्रभाव वाढतो.
vii) राष्ट्र महासत्ताक बनण्याच्या दिशेने मार्गक्रमण करते.
viii) शस्त्रास्त्रांच्या संख्यात्मक व गुणात्मक पातळीवर वाढ होते.
ix) राष्ट्राच्या तिजोरीत परकीय चलन वाढते.

शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे वरील काही सकारात्मक परिणाम होत असले तरी शस्त्रास्त्र स्पर्धेचे नकारात्मक परिणामच अधिक आहेत..

## * निः शस्त्रीकरण :–

निःशस्त्रीकरण ही एक जागतिक शांतता आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक आहे. निःशस्त्रीकरणामुळे गरिबी, बेकारी लोकसंख्येचा विस्फोट, पर्यावरण प्रदूषण, निकृष्ट राहणीमान यासारख्या समस्या सुटतील

निशस्त्रीकरणासंदर्भात जॉर्ज बर्नाड शॉ म्हणतो की नायट्रोजनचा उपयोग बॉम तयार करण्यापेक्षा नायट्रोजनयुक्त खते तयार करण्यासाठी झाला तर ते अधिक फायद्याचे असेल दुसऱ्या महायुद्धानंतर निःशस्त्रीकरणाच्या संदर्भात जग गांभिर्याने विचार करते. अमेरिका आणि सोवियत रशियामधील अण्वस्त्र स्पर्धा अणुबॉम, हायड्रोजन बॉम, नायट्रोजन बॉम, जैविक आणि रासायनिक शस्त्रास्त्रे बनवल्यामुळे निःशस्त्रीकरणाची गरज वाढली. शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे पृथ्वीवरील मानवी संस्कृतीचे अस्तित्व धोक्यात येते मानवी संस्कृतीचे अस्तित्व व जग धोक्यात येऊ नये म्हणून निःशस्त्रीकरणाची योजना पुढे आली.

17 व्या शतकात राष्ट्र राज्य संकल्पनेच्या उदय आणि विकासाबरोबरच निःशस्त्रीकरणाचा उदय आणि विकास उदय होऊन आला 1648 सालच्या वेस्टफालीया तहाशी निःशस्त्रीकरणाचा जवळचा संबंध आहे. 1816 मध्ये रशिया आणि इंग्लंड या देशात शस्त्रास्त्र कपात करण्याविषयी करार झाला 1817 ला इंग्लंड आणि अमेरिकेमध्ये रश बगॉट हा निःशस्त्रीकरणाशी संबंधीत करार झाला निःशस्त्रीकरणासाठी बहुपातळीवर 1898 साली हेग शांतता परिषद घेऊन शस्त्रास्त्र कपातीवर योजना बनविण्याविषयी चर्चा करण्यात आली. याशिवाय राष्ट्रसंघ आणि संयुक्त राष्ट्रसंघ यांच्या पातळीवर निःशस्त्रीकरणासाठी अनेक प्रयत्न झाले.

* निःशस्त्रीकरणाच्या व्याख्या :-

निःशस्त्रीकरण म्हणजे अस्तित्वात असणाऱ्या शस्त्रास्त्रावर नियंत्रण त्यांच्यात कपात किंवा शस्त्रास्त्र पुर्णपणे नष्ट करणे अशा अनेक उपक्रमांचा समावेश होतो. निःशस्त्रीकरण या संकल्पनेच्या काही अभ्यासकांनी खालील

व्याख्या केल्या आहेत.

1) मॉर्गेन्थॉ :-

"शस्त्रास्त्र स्पर्धा नष्ट करण्यासाठी काही किंवा सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रामध्ये कपात किंवा त्यांना नष्ट करणे म्हणजे निःशस्त्रीकरण होय."

2) श्लैस्चर :-

"दोन किंवा दोनपेक्षा अधिक राष्ट्रांमध्ये झालेल्या कराराद्वारे शस्त्रास्त्रांमध्ये कपात त्याच्यावर नियंत्रण किंवा पुर्णपणे नष्ट करणे म्हणजे निःशस्त्रीकरण होय."

3) टि.व्ही. डायक :-

"लष्करी सामर्थ्याशी निगडीत कोणतीही कपात किंवा नियंत्रण म्हणजे निःशस्त्रीकरण होय"

4) प्रा. लक्षटे :-

"युध्द साहित्याशी संबंधीत असणाऱ्या सर्वच बाबींमध्ये कपात किंवा नियंत्रीत करणे म्हणजे निःशस्त्रीकरण होय."

निःशस्त्रीकरणाच्या वरील सर्व व्याख्या निःशस्त्रीकरणाचा अर्थ स्पष्ट करतात. निःशस्त्रीकरण ही संकल्पना सर्वसमावेशक, व्यापक व गतीशील आहे.

★ निःशस्त्रीकरणाचे प्रकार :-

वर्तमान आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासशाखेत निःशस्त्रीकरण ही संकल्पना अनेक अर्थाने वापरली जाते. उदा:- शस्त्रास्त्र नियंत्रण, शस्त्र कपात, शस्त्रास्त्रांचा समुळ नाश इत्यादी यावरुन निःशस्त्रीकरणाचे काही प्रकार

खालील प्रमाणे स्पष्ट करता येतात.

1) गुणात्मक निःशस्त्रीकरण :-

निःशस्त्रीकरणाची ही प्रक्रिया संरक्षण आणि डावपेचात्मक दृष्टीकोनातून महत्त्वाची असणाऱ्या युद्ध साहित्यांच्या कपात व नष्ट करण्याशी संबंधीत आहे. उदा :- रासायनिक शस्त्रास्त्र, अण्वस्त्रे इत्यादी गुणात्मक निःशस्त्रीकरणात समाविष्ट होणारे दोन करार अमेरिका आणि सोवियत रशियामध्ये झाले आहेत.

उदा :- 1972 - साल्ट 1, 1979 - साल्ट 2 (डावपेचात्मक शस्त्रास्त्रांच्या नियंत्रणासाठी वाटाघाटी - Strategic Arms Limitation Talks) (याशिवाय अंशीक अणूचाचणी बंदी करार - P.T.B.T. - Partial test Ban Treaty - 1963) (अण्वस्त्र प्रसार बंदी करार - N.P.T - Nuclear Non Proliferation Treaty - 1967)

असे अनेक करार अमेरिका आणि रशियामध्ये झाले आहेत.

2) संख्यात्मक निःशस्त्रीकरण :-

निःशस्त्रीकरणाची ही प्रक्रिया सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रातील कपात किंवा त्यांना नष्ट करण्याशी निगडीत आहे. उदा :- 1955 साली जिनेव्हा येथे विश्व निःशस्त्रीकरण परिषद झाली या परिषदेत सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रामध्ये कपात करण्याविषयी चर्चा घडून आली.

3) स्थानिक निःशस्त्रीकरण :-

निःशस्त्रीकरणाची प्रक्रिया जेव्हा विशिष्ट राष्ट्राशी संबंधीत असते. तेव्हा त्या प्रक्रियेला स्थानिक निःशस्त्रीकरण म्हणतात या करारामध्ये सहभागी असणाऱ्या राष्ट्रांवरच निःशस्त्रीकरणाची प्रक्रिया बंधनकारक असते. उदा :- 1817

सालच्या रश बगॉट करार हा करार अमेरिका आणि कॅनडा संबंधीत आहे.

4) सार्वत्रिक निः शस्त्रीकरण :-

या निः शस्त्रीकरणाचे करार बहुपक्षीय पातळीवर होतात. या करारात लहान मोठी राष्ट्र सहभागी होतात.

निः शस्त्रीकरणाची ही प्रक्रिया सर्वच राष्ट्रावर बंधनकारक नसते सार्वत्रिक निः शस्त्रीकरणास तत्वतः सर्वच राष्ट्र मान्यता देतात.

5) सक्तीचे निः शस्त्रीकरण :-

सक्तीच्या निः शस्त्रीकरणात राष्ट्रावर कपात करण्यासाठी किंवा पुर्णपणे नष्ट करण्यासाठी दबाव आणला जातो. निःशस्त्रीकरणाची ही प्रक्रिया राष्ट्राच्या इच्छेविरुद्ध लादली ~~आहे~~. जाते. उदा:- पहिल्या महायुद्धानंतर इंग्लंड, अमेरिका व सोवियत रशिया व फ्रान्स जर्मनीचेच सक्तीचे निःशस्त्रीकरण केले.

1922 साली अमेरिका आणि इंग्लडने जपानचे सक्तीचे निः शस्त्रीकरण केले.

6) ऐच्छीक निः शस्त्रीकरण :-

या प्रकारात राष्ट्र स्वःइच्छेने शस्त्रास्त्र कपातीच्या किंवा नष्ट करण्याच्या प्रस्ताव मान्य ~~करणे~~ करतात.

ऐच्छीक निः शस्त्रीकरणासाठी राष्ट्रावर दबाव आणला जात नाही. निः शस्त्रीकरणाच्या प्रस्ताव मान्य करणे किंवा अमान्य करणे हे राष्ट्राच्या इच्छेवर अवलंबुन असते.

) सर्व समावेश नि:शस्त्रीकरण :-
अस्तित्वात असणाऱ्या सर्व शस्त्रास्त्रांचा नाश
र्वसमावेशक निशस्त्रीकरणास अपेक्षित आहे.
सर्वसमावेशक नि:शस्त्रीकरणात शस्त्रास्त्र
ष्ट करण्यास युद्ध साहित्य, शस्त्रास्त्र निर्मितीचे कारखा
लष्करी प्रशिक्षण केंद्रे इत्यादीचाही नाश करण्याचा
आग्रह धरला जातो. हा विचार अव्यवहार्य व आदर्शव
ी आहे. सर्वसमावेशक नि:शस्त्रीकरण राष्ट्रांच्या राजकीय
इच्छाशक्तीशिवाय होऊ शकत नाही.
वरील प्रमाणे नि:शस्त्रीकरण संकल्पनेची
विभागणी विविध प्रकारात केली जाते. आजपर्यंत नि:शस
रण या संकल्पनेवर वरील प्रकारातूनच चर्चा झाली
आहे.

* नि:शस्त्रीकरणाची आवश्यकता / महत्त्व / गरज :-
संयुक्त राष्ट्रसंघ या जागतिक संघटनेचे
नि:शस्त्रीकरण हे प्रमुख उद्दिष्ट आहे. या संकल्पनेला
आज वैश्विक स्वरुप प्राप्त झाले आहे. पृथ्वीवरील मानवी
संस्कृतीच्या संरक्षणासाठी नि:शस्त्रीकरणाशिवाय पर्याप्त नाही
ी जाणीव लोकांमध्ये निर्माण होत आहे. नि:शस्त्रीकरणाची
गरज किंवा आवश्यकता खालील कारणातून स्पष्ट करता येते.
नि:शस्त्रीकरणाच्या समर्थनात खालील काही मुद्दे स्पष्ट
करता येतील.
1) आर्थिक विकासाला प्राधान्य :-
नि:शस्त्रीकरणाच्या प्रक्रियेचे समर्थन आर्थिक
विकासासाठी केले जाते. कारण शस्त्रीकरण ही खूप खर्चिक
प्रक्रिया आहे. शस्त्रास्त्र निर्मिती आणि खरेदीसाठी राष्ट्रांना
आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाचा मोठा भाग राखून ठेवावा
लागतो असे करणे, राष्ट्रांना परवडणारे नसते. नि:शस्त्रीक

रणामुळे संरक्षणावर होणारा खर्च कमी होऊन आर्थिक विकासासाठी अधिकाधिक पैसा वापरता येतो ज्यामुळे राष्ट्रातील सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक, कृषीविषयक समस्या सुटतील लोकांचे राहणीमान उंचावेल गरिबी, बेकारी, लोकसंख्यावाढ, औद्योगिक मागासलेपणा यासारख्या समस्या कमी होतील राष्ट्राची आर्थिक पक्ष सुधारेल राष्ट्राचा विकासदर उंचावेल म्हणून निःशस्त्रीकरणाच्या संकल्पनेची आवश्यकता आहे.

2) सामाजिक विकास :-

निःशस्त्रीकरणामुळे अनेक सामाजिक समस्या सुटण्यासाठी मदत होते. निःशस्त्रीकरणामुळे पर्यावरणाचे संरक्षण होते. मानवी हक्कांचे उलंघन होत नाही. दहशतवादाला पोषक वातावरण मिळणार नाही. शिक्षण आरोग्य, उपासमार, अन्नधान्य या क्षेत्रातील अनेक समस्या ~~निःश~~ निःशस्त्रीकरणामुळे सुटतील या समस्या सुटाव्या म्हणून राष्ट्र निःशस्त्रीकरणाच्या भुमिकेचे समर्थन करते.

3) नैतिक कारण :-

युद्धामधून मोठ्या प्रमाणात जिवत व वित्त हानी होते. म्हणून युद्ध नैतिक दृष्ट्या चुकीचे आहेत. असे काही अभ्यासकांचे मत आहे. युद्ध मानवी संस्कृतीला मिळालेला मोठा श्राप आहे. निःशस्त्रीकरण ही मानवतावादी प्रक्रिया आहे. निःशस्त्रीकरणामुळे संरक्षण खर्चात बचत होते. निःशस्त्रीकरण मानवी संस्कृतीला मिळालेले एक वरदान आहे. वर्तमान अनुयुगात निःशस्त्रीकरणाचा नैतिक आधार महत्वपुर्ण बनला आहे. मानवी संस्कृतीच्या रक्षणाची जबाबदारी निःशस्त्रीकरणावर आहे. मानवी संस्कृतीचा विकास आणि संरक्षण निःशस्त्रीकरणाची

प्रक्रिया अमलात येण्यावर अवलंबून आहे.

4) लोकशाहीच्या संरक्षणासाठी नि:शस्त्रीकरण :-

शस्त्रीकरणाची प्रक्रिया लोकशाही तत्वाच्या विरोधात जाणारी आहे. जे राष्ट्र लष्करी सामर्थ्य वाढविण्यावर अधिक भर देतात, त्या राष्ट्रात लष्करी हुकूमशाहीमुळे लोकशाही व्यवस्था अल्पजीवी ठरते. नि:शस्त्रीकरणाची प्रक्रिया लोकशाहीशी सुसंगत आहे. तसेच लोकशाहीच्या प्रसाराला प्रोत्साहन देणारी आहे.

5) आंतरराष्ट्रीय शांतता आणि सहकार्यासाठी नि:शस्त्रीकरण

शस्त्रीकरणाने राष्ट्रामध्ये भिती आणि तणावाचे वातावरण निर्माण होते. शस्त्रीकरण आंतरराष्ट्र सहकार्य व शांततेला अडथळा निर्माण करते. शस्त्रीकरणामुळे अनेक राजकीय संघर्ष चिघळतात. किंवा किच होतात. उदा:- भारत आणि पाकिस्तान नि:शस्त्रीकरणामुळे राष्ट्रातील भिती आणि तणावाचे वातावरण कमी होऊन परस्पर विश्वास वाढीस लागतो. राष्ट्रे प्रश्न सोडविण्यासाठी परस्पर सहकार्य आणि चर्चेचा आधार घेतात. नि:शस्त्रीकरणामुळे आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर वाढतो. नि:शस्त्रीकरणामुळे राष्ट्रामधील युद्ध पिपासू वृत्ती कमी होते.